अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २५ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १७५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

सांगलीची प्रतीक्षा बागडी ठरली पहिली महिला महाराष्ट्र केसरी

सुराज्य/सांगली

महाराष्ट्रात पहिल्यांदाच महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं होतं. सांगली येथे ही महिला कुस्ती स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत सांगलीतील प्रतीक्षा बागडी आणि कल्याणमधील वैष्णवी पाटील यांच्यात अंतिम लढत झाली. या लढतीत प्रतीक्षा बागडीने वैष्णवी पाटीलला चीतपट करत पहिली महिला महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकावला आहे.

सांगली-मिरज रस्त्यावरील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये महिला महाराष्ट्र केसरी पदकासाठी कुस्ती स्पर्धा गुरुवारपासून सुरू होत्या. अंतिम सामन्यात तुंग (जि.सांगली) येथील बागडी आणि पाटील यांच्यात लढत झाली. सायंकाळी ही अंतिम लढत सुरू झाली. या अंतिम सामन्यात बागडी व पाटील मध्यंतरापर्यंत चार गुणांनी बरोबरीत होत्या. मात्र, मध्यंतरानंतर बागडीने पाटीलला चीतपट करीत चार विरुद्ध दहा गुणांनी महिला केसरी पदकावर मोहोर उमटवली. तत्पूर्वी, सकाळी झालेल्या उपांत्य सामन्यात बागडी हिने कोल्हापूरच्या अमृता पुजारी हिचा ९ विरुद्ध २ गुणांनी पराभव करीत अंतिम लढतीत प्रवेश केला होता. तर, दुसऱ्या कुस्तीमध्ये वैष्णवी पाटीलने वैष्णवी कुशाप्पाचा ११ विरुद्ध १ अशा गुणांनी पराभव करीत अंतिम फेरी गाठली होती.

भाजपचे नियमांवर बोट, राहुल गांधींची पायावर कुऱ्हाड

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

बरोबर दहा वर्षांपूर्वीचा दिवस. दि. २७ सप्टेंबर २०१३. काँग्रेस नेते अजय माकन यांची पत्रकार परिषद सुरू झालेली. त्यावेळी काँग्रेसचे उपाध्यक्ष असणारे राहुल गांधी त्याठिकाणी आले. त्यांनी भर पत्रकार परिषदेत पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळाने काढलेला एक अध्यादेश टराटरा फाडला. तो तोच अध्यादेश होता; ज्यामध्ये शिक्षा झाल्यानंतर आमदारकी/खासदारकी रद्द करण्याच्या न्यायालयाच्या निकालास विरोध करण्यात आला होता. राहुल गांधींनी तो फाडल्यामुळे लागूच झाला नाही. त्याच नियमावर आज भाजपने बोट ठेवले आणि त्यावेळी राहुल गांधींनी उगारलेली कुऱ्हाड आज (स्वत:च्याच) त्यांच्याच पायावर कोसळली आणि आज त्यांचीच खासदारकी रद्द झाली. कागद फाडला नसता तर आज खासदारकी रद्दच झाली नसती.

सन २०१३ मध्ये देशात काँग्रेसचे सरकार होते. मनमोहनसिंग हे पंतप्रधान होते. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयात लिली थॉमस विरुध्द केंद्र सरकार हा खटला सुरू होता. या खटल्यात आमदार किंवा खासदाराला भारताच्या कोणत्याही सक्षम न्यायालयाने दोन किंवा अधिक वर्षांची शिक्षा सुनावली तर त्याची आमदारकी किंवा खासदारकी रद्द होईल, असा महत्त्वपूर्ण निकाल दिला. अर्थात सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर सर्वपक्षीय नेते एकवटले. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात एक अध्यादेश जारी करण्याचा निर्णय घेतला होता. पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी अध्यादेशाचा मसुदा असणारे कागद फाडून टाकले. परिणामी तो अध्यादेश लागूच झाला नाही. जर त्यावेळी तो अध्यादेश लागू झाला असता तर आज त्याच अध्यादेशाच्या आधारे गांधी यांची खासदारकी टिकली असती.

काय झाले होते लिली थॉमस खटल्यात?

लोकप्रतिनिधी कायदा १९५१ कलम ८(४) नुसार एखाद्या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीला फौजदारी खटल्यात (दोन वर्षे किंवा त्याहून अधिक वर्षे शिक्षेची तरतूद असलेल्या कलमांतर्गत) दोषी ठरवण्यात आले आणि त्याने वरच्या न्यायालयात अर्ज दाखल केला तर संबंधित आमदार-खासदार त्या पदावर राहू शकतो, अशी तरतूद होती. मात्र लिली थॉमस खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने ही तरतूद असंविधानिक ठरवली. भारताच्या कोणत्याही न्यायालयाने लोकप्रतिनिधीला दोन किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांची शिक्षा सुनावली तर संबंधित लोकप्रतिनिधीचे सदस्यत्व रद्द होईल आणि संबंधित लोकप्रतिनिधी पुढील सहा वर्षे निवडणूक लढविण्यास अपात्र राहील असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.

दि. २७ सप्टेंबर २०१३ रोजी काय घडले?

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाविरोधात तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग सिंग आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील शरद पवार, प्रणव मुखर्जी, कपिल सिब्बल या दिग्गज नेत्यांनी एक अध्यादेश आणला. त्याविषयी माहिती देण्याकरता अजय माकन यांनी २७ सप्टेंबर २०१३ रोजी पत्रकार परिषद आयोजित केली होती. ऐनवेळी या पत्रकार परिषदेत येऊन राहुल गांधी यांनी त्या अध्यादेशाचा मसुदा असणारे कागद सर्वांसमोर टराटरा फाडून टाकले. 'हे माझे मत आहे' असे सांगून त्या अध्यादेशाला विरोध दर्शवला. त्यावेळी राहुल यांची ती कृती लोकांना आवडली. मात्र त्याच कृतीमुळे तो अध्यादेश लागू झाला नाही आणि केवळ तो अध्यादेश लागू नसल्यामुळे आज दहा वर्षांनंतर राहुल यांच्यावरच त्यांची खासदारकी गमावण्याची वेळ आली.

भाजपने केले नियमाचे तंतोतंत पालन

लिली थॉमस खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ज्यावेळी लोकप्रतिनिधीला देशातील कोणत्याही सक्षम न्यायालयाने न्याय कक्षेत शिक्षेचे वाचन केले; त्याच क्षणाला त्या लोकप्रतिनिधीकडील खासदारकी किंवा आमदारकी रद्द झाली आणि त्याचा मतदारसंघ रिक्त झाला. गुरूवारी सुरतच्या न्यायालयाने राहुल गांधी यांना शिक्षा सुनावली आणि शुक्रवारी सकाळी त्यांची खासदारकी रद्द झाल्याचा आदेश संसदेच्या सचिवालयाने काढला. अर्थात भाजप सरकारने नियमाचे तंतोतंत पालन केले आणि राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केली.

ईडी, सीबीआयचा दुरुपयोग; विरोधकांची सुप्रीम कोर्टात धाव

सुराज्य/मुंबई

गेल्या काही महिन्यांत ईडी आणि सीबीआयकडून विरोधकांची वारंवार होणारी चौकशी यामुळे विरोधक आता चांगलेच आक्रमक झाले आहे. केंद्र सरकारकडून ईडी आणि सीबीआयचा दुरुपयोग होत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षातील नेत्यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. काँग्रेसच्या नेतृत्वात १४ विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मिळून शुक्रवारी (ता. २४ मार्च) सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली. वरिष्ठ वकील मनू सिंघवी यांनी हे प्रकरण सरन्यायाधीशांसमोर ठेवले.

दरम्यान, या प्रकरणाची याचिका दाखल झाली असून आता या प्रकरणी पुढील महिन्यात ५ एप्रिलला सुनावणी करण्यात येणार आहे. गेल्या काही महिन्यात केंद्राने विरोधी पक्षातील नेत्यांना लक्ष केले असून त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये कोर्टाने याबाबतच अटक आणि जामीन मंजूर करण्याच्या बाबतीतले दिशानिर्देश या यंत्रणांना द्यावे, अशी मागणी अभिषेक मनू सिंघवी यांच्याकडून करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी विरोधी पक्षातील नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ईडीच्या प्रमुखांना पत्र लिहिले होते. सर्वात पहिल्यांदा दिल्लीतील अबकारी धोरणात दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना अटक करण्यात आली आहे. ज्यानंतर याप्रकरणी करण्यात आलेली कारवाई ही चुकीची असल्याची सांगत दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, समाजवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षातील नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहीत त्या पत्रावर सह्या देखील केल्या होत्या. त्याचबरोबर उद्योजक गौतम अदानी यांच्या प्रकरणावरून देखील १६ विरोधजी पक्षातील नेत्यांनी ईडीच्या संचालकांना पत्र लिहिले होते. या पत्रामध्ये देखी; नेत्यांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या. दरम्यान, ज्या विरोधी पक्षातील नेत्यांची आधी चौकशी करण्यात येते, त्यांच्या भाजपमधील प्रवेशानंतर ही कारवाई थांबवण्यात येते किंवा त्यांच्या विरोधात अत्यंत संथगतीने कारवाई करण्यात येते. अशी अनेक उदाहरणे आहेत. ज्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक नेत्यांचा समावेश असल्याचे विरोधकांकडून सांगण्यात आले आहे. तर, नारदा स्टिंग ऑपरेशन प्रकरणात टीएमसीचे माजी नेते शुभेंदू अधिकारी आणि मुकुल रॉय हे ईडी आणि सीबीआयच्या निशाण्यावर होते, परंतु राज्यातील विधानसभा निवडणुकींपूर्वी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने या प्रकरणी पुढे कोणतीही चौकशी करण्यात आली नाही.

२.१६ लाख विद्यार्थ्यांचा 'टेट'चा निकाल जाहीर

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून पार पडलेल्या टेट'चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. दोन लाख १६ हजार ४४३ विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर झाला असून राज्यातील शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

शिक्षक भरतीसाठी आता टेट' बंधनकारक करण्यात आले आहे. दरम्यान, २०१९ च्या शासन निर्णयानुसार निश्चित झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित टेट'ची प्रश्नपत्रिका काढण्यात आल्या. पण, परीक्षा खूपच कठीण होती, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे होते. दरम्यान, आयपीबीएस' संस्थेच्या माध्यमातून राज्यातील ९३ केंद्रांवर ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने पार पडली होती. दरम्यान, ५० ते ७० गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याचे सांगितले जात आहे. पण, त्यासंबंधीचा आढावा दोन-तीन दिवसांत घेतला जाणार आहे. त्यानंतर हा निकाल शालेय शिक्षण विभागाकडे पाठवला जाणार आहे. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांची पदभरती व खासगी संस्थांमधील शिक्षक भरती पार पडेल.

आशानगरातील घरगुती कुंटणखान्यावर धाड

एकास अटक तर पीडीतेची सुटका

सुराज्य/सोलापूर

विडी घरकुलमधील आशा नगरात घरात कुंटणखाना चालवण्यात येत असल्याची माहिती अनैतिक मानवी प्रतिबंधक विभागाला मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून एका संशयित आरोपीला अटक केली असून, पीडितेची सुटका केली आहे.

दिलीप सिध्दप्पा मंगरुळे (वय-४०,रा.सुनील नगर) असे अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाला वरील ठिकाणी वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाली.

या माहितीवरून पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवले. त्यानंतर याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी वरील ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी एका पीडितेची सुटका केली. आरोपी हा पीडितेला पैशाचे आमिष दाखवून तिला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडत तिच्याकडून वेश्या व्यवसाय करवून घेत होता. त्याच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून,त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ३१ मार्चपर्यंत पोलीस कस्टडी सुनावली आहे.ही कामगिरी मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे बजरंग साळुंखे, सहा.फौजदार राजेंद्र बंडगर, महादेव बंडगर,

अ. सत्तार पटेल,अकिला नदाफ, नफिसा मुजावर, अरुणा परब, तृप्ती मंडलीक, रमादेवी भुजबळ, उषा माळगे, सीमा खोगरे, शैला चिकमळ,दादा गोरे यांनी केली.

केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या डीएमध्ये ४ टक्क्यांच्या वाढीला सरकारची मंजुरी

नवी दिल्ली : सरकारने एक कोटीहून अधिक केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांना मोठी भेट दिली आहे. सरकारने महागाई भत्ता आणि महागाई सवलतीत ४ टक्क्यांनी वाढ केली आहे.

आता दोन्ही ३८ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांपर्यंत वाढले आहेत. सध्याची वाढ १ जानेवारी २०२३ पासून लागू होईल. यामुळे सरकारवर दरवर्षी १२,८१५ कोटी रुपयांचा आर्थिक बोजा वाढणार आहे. दुसरीकडे, सरकारने उज्ज्वला सिलिंडरवरील अनुदान आणखी एक वर्षासाठी वाढवलं आहे. देशातील ९.६० कोटी लाभार्थ्यांना एका वर्षासाठी २०० रुपये प्रति सिलिंडरचा लाभ मिळणार आहे. केंद्र सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या डीए आणि डीआरमध्ये वर्षातून दोनदा जानेवारी आणि जुलैमध्ये सुधारणा केली जाते. सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता दिला जातो, तर निवृत्ती वेतनधारकांना महागाई भत्ता दिला जातो. सध्याची वाढ १ जानेवारी २०२३ पासून लागू होईल.

डीएची थकबाकी मिळेल का? : केंद्राने १८ महिन्यांच्या डीए थकबाकीवर स्पष्टीकरण जारी केले होते. कर्मचाऱ्यांची १८ महिन्यांची महागाई भत्ता थकबाकी दिली जाणार नाही असे सांगण्यात आले होते. कोविड महामारीच्या काळात ते थांबवण्यात आले होते. कोविड महामारीच्या पार्श्वभूमीवर केंद्राने २०२० मध्ये महागाई भत्ता आणि महागाई मदतचे तीन हप्ते थांबवले होते. या वेळेपासून केंद्र सरकारचे कर्मचारी आणि पेन्शनधारक प्रलंबित थकबाकीबाबत अपडेटची प्रतीक्षा करत आहेत. या निर्बंधामुळे केंद्रीय कर्मचाऱ्यांचे ३४ हजार कोटी रुपये वाचले होते.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

फोर्टिफाइड..!

कल्याण
280-01-380

मेन बाजार
369-8

गारपिटीचे पंचनामे | तीन हजार शेतकऱ्यांचे पावणे तीन कोटींचे नुकसान

प्रशासनाचा संयुक्त अहवाल शासनास सादर

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात १४ ते १८ मार्च या पाच दिवसात वादळी वारे, अवकाळी पाऊस व गारपिटीने १०४ गावातील तब्बल ३ हजार शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या शेतकऱ्यांच्या १ हजार ७५८ हेक्टरवरील शेती पिकांचे सुमारे २ कोटी ६८ लाख ९३ हजार ९५५ रुपयांचे नुकसान झाले आहे. शासनाच्या निकषानुसार ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतीपिकांचे महसूल, जिल्हा परिषद आणि कृषी विभागाने संयुक्त अहवाल तयार करून तो शासनाला सादर केला आहे.

चालू मार्च महिन्यात १४ ते १८ तारखेच्या दरम्यान अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला. काढणीला आलेल्या द्राक्षे, गहू, हरभरा पिकाबरोबरच पपई, केळी व अन्य शेती पिकांना मोठा फटका बसला. काढणीला आलेली पिके हातची गेल्याने बळीराजावर अश्रू ढाळण्याची वेळ आली. काबाडकष्ट करून पिकविलेला शेतीमाल डोळ्यादेखत नष्ट होत असल्याचे पाहून शेतकऱ्यांना रडू कोसळले. अगोदरच कोणत्याच शेतीमालाला यंदा बाजारात भाव नाही. अशातच निसर्गाच्या अवकृपेने आहे तेही हिरावून नेल्याने आता वर्ष कसे जगायचे या प्रश्नाने शेतकऱ्यांसमोर काहूर माजले आहे.

अवकाळी व गारपिटीचा सर्वाधिक दणका पंढरपूर आणि अक्कलकोट तालुक्याला बसला. ९२ शेतकऱ्यांच्या जिरायती पिकांचे ७१ हेक्टरवरील ९ लाख ६९ हजार ६८० रुपयांचे, बागायत

पिकाखालील २००३ शेतकऱ्यांच्या ९८८ हेक्टरवरील १ कोटी ३३ लाख ३८ हजार ६७५ तर फळपिके असलेल्या ९०५ शेतकऱ्यांचे ६९९ हेक्टरवरील १ कोटी २५ लाख ८५ हजार ६०० रुपयांचे असे एकूण ३ हजार शेतकऱ्यांच्या १ हजार ७५८ हेक्टरवरील २ कोटी ६८ लाख ९३ हजार ९५५ रुपयांचे नुकसान झाल्याचा अहवाल प्रशासनाने तयार केला आहे. तो अहवाल शासनाकडे पाठविला असून या अहवालानुसारच आता शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे. मात्र गेल्या वर्षी सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीची मदत अजूनही बहुतांश शेतकऱ्यांना मिळाली नाही. त्यामुळे आताच्या गारपीट नुकसानीच्या मदतीसाठी शेतकऱ्यांना प्रतीक्षाच करावी लागणार असल्याचे चित्र आहे.

आशा भोसलेंना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार

मुंबई : राज्याचा सर्वोच्च महाराष्ट्र भूषण' पुरस्कार गेली सात दशके रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या पद्मविभूषण ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

गेट वे ऑफ इंडिया येथे एका दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर आणि मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर उपस्थित होता.